# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

९वा मजला, सेंटर १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई- ४०००0५
दुरध्वनी : ०२२ - २२१५२०१९, ६९३७२००० Email : mwrra@mwrra.in

## जाहीर सुचना

सन २०१४ या तुटीच्या वर्षात उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यातील समन्यायी पाणी वाटपासंदर्भात माहे एप्रिल २०१४ मध्ये दाखल केलेल्या याचिकांवर प्राधिकरणाने सुनावणी घेऊन दि. १९/०९/२०१४ च्या आदेशान्वये निर्णय दिला होता. तदनंतर, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २३/०९/२०१६ रोजी दिलेल्या आदेशान्वये प्राधिकरणाच्या सदर आदेशाचे दृढिकरण केले आहे. सदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशातील परि.१९५ (xi) नुसार प्राधिकरणाने मार्गदर्शक तत्वांचे (Guiding Principles) पुनर्विलोकनाची प्रक्रिया एप्रिल २०१८ मध्ये सुरु केली होती. सदर प्रक्रियेच्या प्रथम टप्प्यामध्ये आधारभूत तपशीलाचे (डाटा) पुनर्विलोकनाचे काम (परिशिष्ठे १ ते ७ आणि प्रपत्र १ ते १०) फेब्रुवारी २०२० मध्ये पूर्ण केले.

तदनंतर, राज्य शासनाने सदर प्रकरणी जुलै २०२३ मध्ये गोदावरी खोऱ्यातील जलाशयांच्या एकात्मिक प्रवर्तनाकरिता विनियमन तयार करण्यासाठी गोदावरी अभ्यास गट -२ स्थापन केला. सदर अभ्यास गटाने प्राधिकरणास सादर केलेल्या इंग्रजी अहवालावर दिलेल्या मुदतीत (१५ एप्रिल २०२५) प्राप्त अभिप्रायांमधील लोकभावना विचारात घेऊन अहवाल मराठीत उपलब्ध करण्याचे आदेश प्राधिकरणाने अभ्यास गटास दिले होते. त्यानुसार हा अहवाल प्राप्त झाला असून तो प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (https://mwrra.maharashtra.gov.in/) ठेवण्यात आला आहे. यावर काही अभिप्राय/हरकती असल्यास त्या, जाहिरातीच्या दिनांकापासून एक महिन्यात प्राधिकरणास लेखी स्वरुपात किंवा ई-मेलद्वारे पाठवाव्यात. ज्यांनी इंग्रजी अहवालावर अभिप्राय दिले आहेत त्यांचे नव्याने वेगळे काही अभिप्राय असतील तरच द्यावेत, पूर्वीचेच अभिप्राय पुन्हा पाठवू नयेत.

**सचिव**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**